# महाराष्ट्र शासन
## वेतनपथक (उच्च शिक्षण)
## पुणे विभाग, पुणे
## १७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१
Web - www.jdhepune.info   Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२


क्रमांक- वेतन - २०२०/२०२०-२१/११/वेतनपथक, पुणे दिनांक - १२ फेब्रुवारी, २०२१

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे

**विषय - वेतन अनुदान माहे फेब्रुवारी - २०२१.**

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन अनुदानाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती तयार करुन त्याप्रमाणे सदरहू माहिती एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी **आणि सदरहू देयक खाली नमूद केलेल्या तारखेला व वेळेतच या कार्यालयाकडे फॉरवर्ड करण्यात येऊन त्याची इमेलदेखील खाली नमूद केलेल्या तारखेला व वेळेतच सादर करावी.**

माहे फेब्रुवारी, २०२१ या महिन्याचे वेतन देयक नियमीत पद्धतीने ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने तयार करण्यात येऊन फॉरवर्ड/सादर करावे.

माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन देयक सादर करतांना अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेसाठी (डी.सी.पी.एस.) कर्मचा-यांची जुलै, २००६ या महिन्याची कपात करावयाची असून त्यासाठी **महागाई भत्त्याचे ०२ टक्के दराने परिगणन करावे.**

**जे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी माहे एप्रिल, २०२१ मध्ये सेवानिवृत्त होणार आहेत त्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम कपात करण्यात येऊ नये.**

**माहे जानेवारी, २०२१ या महिन्याच्या वेतनापेक्षा माहे फेब्रुवारी, २०२१ या महिन्याचे वेतन देयकामध्ये वेतननिश्चितीमुळे ज्या कर्मचा-याच्या वेतनामध्ये फरक पडला आहे त्यांच्या वेतननिश्चितीच्या पीडीएफ मधील प्रतीदेखील फेब्रुवारी, २०२१ या महिन्याच्या वेतन देयकासोबत इमेलद्वारे सादर करण्यात याव्यात.**

**माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन देयकासोबत खालील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**उपयोगिता प्रमाणपत्र**

**प्रमाणित करण्यात येते की खाली नमूद केलेली माहिती अचूक असून त्याची खात्री मी स्वतः यासाठीच्या आवश्यक असणा-या सर्व नोंदवहया तपासून करुन घेतली आहे. यामध्ये काही चुक आढळल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.**

| अ. क्र. | महिना | तपशील | सहसंचालक पुणे यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेतन खात्यामध्ये जमा केलेली रक्कम | प्रत्यक्ष वितरीत रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| | | **एकूण** | | | | |

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन आपण आपले महाविद्यालय/अकृषी आणि अभिमत विद्यापीठाचे माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन देयक एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये फॉरवर्ड करावे आणि अशा ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने तयार केलेल्या वेतन देयकाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती इमेलद्वारे payunit@jdhepune.info या इमेल आयडीवर खाली नमूद केलेल्या दिनांकास व वेळेतच सादर करावी. **इतर कोणत्याही दिवशी संबंधीत जिल्ह्यांव्यतिरिक्त इतर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी त्यांचे वेतन देयक इमेलद्वारे अथवा एचटीई सेवार्थ प्रणालीद्वारे फॉरवर्ड करु नये त्याचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | १५/०२/२०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० |
| २ | पुणे जिल्हा | १६/०२/२०२१ | |
| ३ | अहमदनगर | १७/०२/२०२१ | |
| ४ | नाशिक | १८/०२/२०२१ | |

**सही/-**
(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे